दै. पुण्य नगरी दि. 13/12/2019

# दुचाकी चोरटा स्थागुशाच्या जाळ्यात

पुण्य नगरी दि. 13/12/19

**नांदेड/ प्रतिनिधी**

शहरात एका दुचाकी चोरट्याला स्थानिक गुन्हे शाखा पथकाने अटक केली आहे.

शहरातील इतवारा ठाण्यात दाखल गुरनं २७३/१९ कलम ३०७, ३४ सहकलम ३/२५ भाहका गुन्हयातील अनोळखी आरोपींचा शोध घेत स्थानिक गुन्हे शाखा पथक गोविंदबाग मार्गावर गेले असता एक संशयित तरुण पॅशन प्रो दुचाकी ढकलत नेताना दिसला. त्यास या पथकाने थांबण्यास सांगितले असता, त्याने त्याचे ताब्यातील दुचाकी जागीच सोडून पळू लागला. तेव्हा या पथकाने त्याला पकडले. त्याने आपले नाव दत्ता नारायण भरकडे (२३ रा. गाडीपुरा नांदेड) असे सांगितले. ही दुचाकी चोरीची असून एका अनोळखी व्यक्तीने ही दुचाकी ढकलत ने असे सांगितल्याची माहिती दत्ताने दिली. ही दुचाकी जप्त करुन स्थागुशा पथकाने तपास केला असता त्याच्याविरुद्ध भाग्यनगर व वजिराबाद पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल असून, भाग्यनगरच्या गुन्ह्यात न्यायालयाने त्याच्याविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट काढल्याचे आढळून आले. त्यामुळे दत्ताला भाग्यनगर पोलिसांच्या हवाली करण्यात आले. दत्ता रेकॉर्डवरील गुन्हेगार असून, त्याच्याकडून आणखी काही गुन्हे व चोरीच्या घटना उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. पोलीस अधीक्षक विजयकुमार मगर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक दत्ताराम राठोड, स्थागुशाचे पोलीस निरीक्षक शिवाजी डोईफोडे यांच्या मार्गदर्शनात सपोनि पांडुरंग भारती, सपोउपनिरीक्षक जसवंतसिंह शाहू, पोकाँ तानाजी येळगे, पोकॉ मोतीराम पवार, पोकॉ राजू पूल्लेवार, पोकॉ बजरंग बोडके, पोकॉ बालाजी यादगीरवाड, पोहेकॉ शेख यांनी ही कारवाई केली.